# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४

क्र.कोविम/माध्य.गोप./ ३६८१

कोल्हापूर-४१६००४

दिनांक : २४.०३.२०२०

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

सर्व मंडळ मान्यताप्राप्त शाळा/क.महाविद्यलय,

**विषय : फेब्रु./मार्च २०२० माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेच्या उत्तरपत्रिक शिक्षकांना घरी तपासणीसाठी देणेबाबत......**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च २०२० उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षा दि. १८.०२.२०२० ते दि. १८.०३.२०२० या कालावधीत व शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षा दि. ०३.३.२०२० ते दि. २३.०३.२०२० या कालावधीत आयोजित करण्यात आलेली होती. त्यापैकी दि. २३.०३.२०२० रोजीचा इ. १० वीचा सामाजिक शास्त्रे भाग-२ (भूगोल ) या विषयाचा लेखी परीक्षा शासन आदेशानुसार स्थगित करण्यात आली आहे.

उत्तरपत्रिका मूल्यांकन व नियमन करण्यासाठी पूर्वी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांच्या नावाने उत्तरपत्रिकांचे पार्सल पाठविण्यात येत होते. उत्तरपत्रिका परीक्षण व नियमनाचे काम परीक्षक व नियामक यापूर्वी घरी करत असत. सदर पध्दतीमध्ये गोपनीयता राखली जात नव्हती व गैरप्रकार होण्याची शक्यता विचारात घेता अशा गोष्टींना आळा बसण्यासाठी उत्तपत्रिका मूल्यांकन व नियमनाच्या कामामध्ये गोपनीयता राखण्यासाठी तसेच उत्तपत्रिका तपासण्याच्या कामामध्ये विलंब होवू नये यासाठी सदरहू काम नियुक्त परीक्षक व नियामक कार्यरत असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये करण्याची कार्यपद्धती सर्व विभागीय मंडळामध्ये ऑक्टोबर २००७ परीक्षेपासून ही योजना राबविण्यात येत आहे.

उत्तरपत्रिका परीक्षक व नियामक यांच्या घरी तपासणीस दिल्यास उत्तरपत्रिका गहाळ होण्याची शक्यता गोपनीयतेचा भंग व सुरक्षितता तसेच निर्धारित वेळेत उत्तरपत्रिका तपासून न होण्याची शक्यता व मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दि. १० जून पूर्वी परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येणाऱ्या संभाव्य अडचणी या सर्व बाबी लक्षात घेता विकेंद्रित केंद्रीय मूल्यमापन योजना अवलंबून उत्तरपत्रिका तपासणी होणे आवश्यक आहे.

मात्र राज्यात कोरोना आजाराच्या प्रादूर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुट्टी देण्यात आली आहे. त्यामुळे शाळेत येवून उत्तरपत्रिकांचे परीक्षण व नियमन करण्यात अडचणी येत आहेत.

सदरहू पार्श्वभूमी विचारात घेता व उपरोक्त दोन्ही परीक्षांचे निकाल वेळेत लागणे आवश्यक असल्याने खास बाब म्हणून केवळ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना परिक्षण व नियमनासाठी घरी देण्याचे शासनाकडून प्राप्त झालेल्या ई-मेलव्दारे आदेशानुसार पुढील अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षा फेब्रु./मार्च २०२० च्या उत्तरपत्रिका परिक्षण व नियमानासाठी शिक्षकांना त्यांच्या घरून तपासण्यास केवळ या परीक्षेपूर्ती अनुमती देण्यात येत आहे.